2019-20

3.2.1 Number of papers published per teacher in the Journals Notified on UGC website during the year 2016-17 to 2021-22

| Title of Paper | Name of The author/s | Department of The teacher | Name of journal | Year of publication | ISSN number | Link to the recognition in UGC enlistment of the Journal |
|---|---|---|---|---|---|---|
| Dr Baba Saheb Ambedkar Yanche Shikshan Vishayak Drushtikon | Dr.V.M.Dehankar | Dept. of History | Rsearch Journey | Jan.,2020 | ISSN-2348-7143 Impact Factor 6.261 | www.researchjourney.net |
| Bitish Kalkhandatil Bhartiya Hastoudyogavaril Arthik Prabhav | Dr.V.M.Dehankar | Dept. of History | Vidyawarta | Feb.,2020 | ISSN-2319-9318 Impact Factor 7.041 | www.vidyawarta.com |
| Gramgitetil Udyogshilata | Dr.V.M.Dehankar | Dept. of History | Ajanta Prakashan | March, 2020 | ISSN-2277-573Q Impact Factor 6.399 | www.sjifactor.com |
| Stri Vishayak Adhikarat Fule, Sahu, Ambedkar Yanche Yogdan | Dr.V.M.Dehankar | Dept. of History | Rsearch Journey | Mar.,2020 | ISSn-2348-7143 Impact Factor 6.261 | www.researchjourney.net |

HOD
Dept. of History,
G.B.Murarka Arts & Comm.College,
Shegaon

G.B.MURARKA COLLEGE OF ARTS & COMM. SHEGAON Dist Buldhana

Principal
G.B.Murarka Arts & Comm.
College, Shegaon

Impact Factor – 6.625 ISSN – 2348-7143

I.F.

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S


# RESEARCH JOURNEY

International Multidisciplinary E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

January-2020 Special Issue – 217 (B)

## IMPACT OF VALUES BASED ON M.K.GANDHI, PT. J. NEHRU, DR. B. R. AMBEDKAR & DR. PANJABRAO DESHMUKH'S PHILOSOPHIES IN PRESENT SITUATION



**Guest Editor:**
Dr. Rameshwar M. Bhise,
Principal,
Shri Shivaji College of Arts, Commerce and Science,
Akola [M.S.] INDIA

Hon. Sheshraoji S. Khade,
Secretary,
Shri Shivaji Education Society, Amarawati

**Chief Editor:**
Dr. Dhanraj T. Dhangar

**Executive Editor of the issue:**
Dr. Jivan H. Pawar
Dr. A. S. Raut
Dr. G. V. Korape
Dr. Sanjay J. Tidke
Dr. Ananda B. Kale,
Dr. S. D. Thorat

2019-20

Principal
G.B.Murarka Arts & Comm.
College, Shegaon

HOD
Dept. of History
G.B.Murarka Arts & Comm. College

अकोला

Impact Factor 6.62

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

G.B. Murarka Arts & Comm. College, Shegaon, Dist Buldhana

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

| | | | |
|---|---|---|---|
| 12 | महात्मा गांधींचे अहिंसेसंबंधीचे विचार | प्रा.अरुण मुकुंदराव शेळके राज्यशास्त्र विभाग प्रमुख<br>शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय,अकोला | |
| 13 | महात्मा गांधींचा मानवतावादी विचार | डॉणश्रीकृष्ण काकडे<br>मराठी विभाग<br>शंकरलाल खंडेलवाल<br>महाविद्यालयएअकोलाए444002ण | |
| 14 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सांस्कृतिक योगदान | प्रा. दिवाकर सदांशिव<br>सरस्वती कला महाविद्यालय, दहिहांडा,<br>जि. अकोला | |
| 15 | सद्य परिस्थितीवर एम के गांधी यांच्या तत्वाज्ञानात्मक मुल्यांचा प्रभाव | कल्याणी वि.मंडलिक | Fee Paid<br>Dt.17.01<br>.2020 |
| 16 | आधुनिक काळात गांधीजीच्या विचारांची प्रासंगिकता | प्रा. डॉ. रमेश गुलाबराव सुरळकर | |
| 17 | VALUE EDUCATION THROUGH INDIAN CULTURE | Dr. Amit S. Tankar<br>(Librarian)<br>Shri. Dr.R.G.Ratod Arts and Science<br>College ,Murtizapur.Dist.Akola.<br>Mobile No. : 09552375415. | |
| 18 | महात्मा गांधीजीचे मुल्यधारीत शिक्षण विचार –चिकित्सक विश्लेषण | प्रा. डॉ. सुभाष शकंरराव पवार<br>कला व वाणिज्य महाविद्यालय,<br>वरवट बकाल, जि. बुल–सजयाणा<br>मो. नं. 9423721646 | |
| [redacted] | [redacted] | [redacted] | |

HOD
Dept. of History,
G.B.Murarka Arts & Comm.College,
Shegaon

G.B. Murarka College of Arts & Comm. Shegaon Dist Buldhana

Principal
G.B.Murarka Arts & Comm.
College, Shegaon

Dr.Umesh Ghodeswar documents 21st Jan.2020

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा शिक्षण विषयक दृष्टीकोण

प्रा. डॉ. विलास एम डेहनकर

ग. भि. मुरारका महाविद्यालय,

शेगांव, जि. बुलढाणा ४४४२०३

इ. मेल आयडी : vilasdehankar23@gmail.com

**सारांश :—**

मुल्यशिक्षण ही काळाची गरज असुन ती जीवनप्रणली व्हावी अशी अपेक्षा आहे. मानवी मुल्य हे असे विधायक वर्तन आहे की ज्यातून व्यक्ती विकास, समाज विकास व राष्ट्रविकास निर्माण होवू शकतो. भारतीय संस्कृती, इतिहास, समाज सुधारक व तत्ववेत्ते यांचे बहुमूल्य विचार हा मुल्यशिक्षणाचा ठेवा आहे. तो एका पिढीतून दुसऱ्या पिढीत संक्रमित व्हावा लागतो. तेव्हा कोठे मुल्यधारीत समाज निर्मिती होत असते. त्या दृष्टीने विचार करता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा शिक्षण विषयक दृष्टीकोण महत्वाचा ठरतो.

**प्रस्तावना :—**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपली संपूर्ण हयात अस्पृश्यता व जातीवाद याच्या निवार्नार्थ घालविली. भारतातील हजारो वर्षापासुन दुर्लक्षित असलेला दलित वर्ग यांना शिक्षण मिळाले पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. शिक्षणाबाबत त्यांचा विधायक व रचनात्मक दृष्टीकोण होता. शिक्षण हा सामाजीक, आर्थिक व राजकीय क्रांतीचा मुलाधार आहे असे ते मानतात. शिवाय शोषण मुक्तीचा तो एक मार्ग आहे. शिक्षणातून माणुस घडत असतो. तसेच शिक्षण म्हणजे ज्ञान व प्रज्ञा यांचा सुरेख संगम होय असे ते मानवात.[१] लोकशाही बळकट करण्यासाठी सुशिक्षित समाजाची अत्यंत गरज आहे. त्यासाठी शिक्षित व मुल्याधिष्ठीत समाजाची निर्मिती शिक्षणातून झाली पाहीजे.

**प्राथमिक शिक्षणाबाबतचे विचार :—**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते प्राथमिक शिक्षणाचा प्रसार राष्ट्रीय दृष्टया अत्यंत महात्वाचा आहे. प्राथमिक शिक्षणाचा सर्वत्र प्रसार हा राष्ट्रीय प्रगतीचा पाया आहे. त्यामुळे हा प्रश्न लोकांच्या इच्छेवर सोपवू नये. त्यासाठी सक्तीच्या कायद्याची गरज आहे. इंग्रजाच्या शिक्षणविषयक धोरणावर डॉ. आंबेडकर संतुष्ट नव्हते. इ. स. १९१६ पासुन १९२३ पर्यंत शिक्षणाची आकडेवारी पाहाता, शिक्षणावरील खर्चात १०० टक्के वाढ झाली. मात्र विद्यार्थ्यांच्या संख्येत २९ टक्केच वाढ झाली. तर वरच्या वर्गात पर्यंत ही टक्केवारी कमी होवून १८ टक्कयांपर्यंत आली.[२] शिक्षण विषमता दुर करण्यासाठी सामाजिक व आर्थिक दृष्टया मागासलेल्यांना सवलती देवून इतरांच्या बरोबर समान पातळीवर आणले पाहिजे. निरक्षरता नष्ट करणे हे सरकारचे प्राथमिक आणि पवित्र कर्तव्य आहे.

HOD
Dept. of History,
G.B.Murarka Arts & Comm.College,
Shegaon

G.B.MURARKA COLLEGE OF ARTS & COMM. SHEGAON Dist Buldhana

Principal
G.B.Murarka Arts & Comm.
College, Shegaon

# VIDYAWARTA®

Peer Reviewed International Refereed Research Journal

Special Issue- February- 2020 (Vol- I)


I.F. 7.041

Sahakar Maharshi Late Bhaskaarrao Shingne
Smruti Arogya and Shikshan Prasarak Mandal's

# SAHAKAR MAHARSHI LATE BHASKARRAO SHINGE ARTS COLLEGE,

KHAMGAON, DIST.BULDHANA (M.S.)

(Affilliated to Sant Gadge Baba Amravati University, Amravati.)

(2) 2019-20

HOD
Dept. of History,
Murarka Arts & Comm. College
Shegaon

G.B. MURARKA COMM. COLLEGE SHEGAON Dist. Buldhana

Principal
G.B.Murarka Arts & Comm.
College, Shegaon

• Organizes •

One Day Inter Disciplinary National Conference on

## HUMANITIES, CULTURE AND SOCIETY

26) अण्णाभाऊ साठे यांच्या पोवाडे व लावणीतील मानवतावादी दृष्टिकोन
डॉ. विष्णू नामदेव लांडे, वाशीम ||87

27) वास्को डी गामा : साहशी पोर्तुगीज खलाशी
प्रा. ज्ञानेश्वर दामोधर वारंगे, धांवूरबाजार ||89

28) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सांसदीय लोकशाहीसंबंधी विचार
डॉ. सुनिता मनवर, शेंदुरजना (अढाव) ||91

29) ब्रिटीशांचे भारतातील आर्थिक शोषणांचे धोरण व त्यांच्या अवस्था
प्रा. डॉ. वाय. एस. माहुरे, घाटंजी ||93

30) संस्कृती रक्षण काळाची गरज
प्रा. डॉ. गोकुल एस. डामरे, शेगांव ||95

31) भारतीय समाजावर परकिय हल्यांचा प्रभाव
श्री. विनोद उखर्डा धर्माळ, बुलडाणा ||97

32) ब्रिटीशांचा भारतातील शेतीच्या व्यापारीकरणावरील आर्थिक प्रभाव
डॉ. सुभाष एस. पवार, बुलडाणा ||100

33) [redacted] ||103

34) इतिहालेखनात सबाल्टर्न इतिहासलेखन प्रवाहाचे महत्त्व
कु. भाग्यश्री श्रीकृष्णराव गाडगे, अमरावती ||105

35) ब्रिटीश वऱ्हाड प्रांतातील स्त्री विषयक सामाजिक सुधारणांचा प्रारंभ
प्रा. डॉ. भास्कर शा. वझिरे, अकोला. ||109

36) विदर्भातील आद्य ग्रंथालय - बाबुजी देशमुख ग्रंथालयाचे योगदान
प्रा.डॉ.संतोष गोपाळकृष्ण कुलकर्णी, अकोला ||111

37) १९ व्या शतकालीन महाराष्ट्रातील स्त्री परिवर्तनाच्या चळवळीचा इतिहास
प्रा. सुनिल मदन मनवर, अकोला ||113

www.vidyawarta.com/03 http://www.printingarea.blogspot.com



HOD
Dept. of History,
G.B.Murarka Arts & Comm.College,
Shegaon

COLLEGE OF ARTS & COMM. MURARKA SHEGAON Dist.Buldhana

Principal
G.B.Murarka Arts & Comm.
College, Shegaon

33

# ब्रिटीश कालखंडातील भारतीय हस्तोद्योगांवरील आर्थिक प्रभाव

प्रा. डॉ. विलास एम. डेहणकर
सहयोगी प्राध्यापक, इतिहास, विभाग प्रमुख,
ग. भि. मुरारका महाविद्यालय, शेगांव, जि. बुलडाणा

**प्रस्तावना :-**

सुती वस्त्रोद्योगाबरोबरच प्राचिन काळापासून भारतात रेशिम, मलमल हे उद्योग भरभराटीस आले होते. इतकेच नव्हे तर या उद्योगांनी जगात ख्याती प्राप्त केलेली होती. काश्मिरमध्ये लोकर उद्योग भरभराटीस आलेला होता. या उद्योगामुळे मोठया प्रमाणात भारतीयांना रोजगार उपलब्ध झालेला होता. मात्र ब्रिटीश काळात भारतीय कुटिरोद्योग बंद पडून बेकारीत वाढ झाली.

**ब्रिटीश कालखंडात पारंपारिक उद्योगांचा ऱ्हास**

इ. स. १७५७ ला प्लासीच्या लढाईत भारतात 'ब्रिटीश इस्ट इंडिया कंपनीची' सत्ता द्रुढमुल झाली. ब्रिटीश कंपनीची सत्ता स्थापन झाली तेव्हापासून तर पुढे इ. स. १९४७ पर्यंत ब्रिटीशांची भारतातील निती ही भारतीय संपत्तीचे शोषन करण्याचीच होती. त्यामुळे भारतीय उद्योगधंद्यांचा नाश करणे हीच ब्रिटीशांची निती होती. भारतातून कच्या मालाचा इंग्लडमधिल कारखाण्यांना सतत पुरवठा व्हावा व ब्रिटनध्ये तयार झालेला पक्का माल विशाल भारतीय बाजारपेठेत विकून दुहेरी नफा कमवावा हाच भारतातील ब्रिटीश शासनाचा प्रमुख उद्देश होता.[१] ब्रिटीशांच्या सुरक्षिततेसाठी व शोषणाच्या उद्देशाने इंग्रजांनी भारतात रेल्वे, डाकसेवा, तारायंत्रे, रस्ते, बंदरांचा विकास, सिंचन योजना इत्यादी कार्य केले. पूढे भारतातील उद्योगधंद्याच्या विकासासाठीही त्या कारणीभूत ठरल्यात. इ. स. १८५३ ला गव्हर्णर जनरल लॉर्ड डलहौसीने असे मत व्यक्त् केले की, इंग्लडला मोठया प्रमाणात कापसाची नितांत गरज आहे. म्हणून भारतात दळणवळणाची व्यवस्था निर्माण करावी तरच येथून इंग्लंडला जलदगतीने कापूस पाठविता येईल. त्यातूनच रेल्वेची सुरुवात झाली.[२] रेल्वेमुळे भारतातील अनेक उद्योगांना चालना मिळाली. भारतात रेल्वे सुरु करण्यासंबंधी डलहौसीने निर्णय घेतला. तेव्हा २३ जुलै १८५३ ला न्युयॉर्क डेली ट्रिब्यून या वृत्तपत्रात [illegible]संबंधे लिहिले ।ि ।ळिसा आर्णि लोर्णि असलेल्या देशात रेल्वेचा प्रारंभ ल्यास, त्या देशाला त्याची र्निर्मिती रिंर्यीपासून तुम्ही रोर्णू शति ्राही. तेथील उद्योर्णिा चालना दिल्याशिवाय तुम्ही तेथे रेल्वेचे जाळे र्यिणू र्शा त ्राही. रेल्वे सुधारर्णि भारताच्या आधुर्नि युर्णित अर्ग्रेसर म्हणूर्न र्यिं रील.[३] पुढील ।ळात ही बाब सत्य ठरली तरीही इंर्ग्रजांच्या या र्नितीने भारतातील पारंपारी उद्योर्णिा ऱ्हास झाला.

भारतातील शेती व्यवसाय व त्यावर आधारित उद्योग परस्परांना पूरक असे होते. त्यामुळे भारतातील खेडी स्वयंपूर्ण होती. ब्रिटीशांनी मात्र भारतात वसाहतवादी अर्थव्यवस्था आणल्याने संपूर्ण ग्रामीण जीवनाची घडीच विस्कटली. १८ व्या शतकाच्या पूर्वार्धात भारतात अनेक उद्योगधंदे भरभराटीला आहे होते. सुती वस्त्रोद्योग, रेशीम, लोकर, मलमल, सुगंधीत द्रव्ये, रंगद्रव्ये, कागद, जहाजबांधणी इत्यादी व्यवसाय ग्रामीण भागातही विकसीत झाले. बंगालमधिल ढाका, मुर्शिदाबाद, बिहारमध्ये पाटणा, उत्तरप्रदेशात जौनपूर, वाराणसी, लखनौ, आग्रा, पंजाबप्रांतात मुलतान व लाहोर, गुजरातमध्ये अहमदाबाद, सुरत, मध्यभारतात चंदेरी, बऱ्हाणपुर, आंध्रप्रदेशात मच्छलपट्टणम, विशाखापट्टणम, महाराष्ट्रात औरंगाबाद, पैठण, कार्णाटकात बंगलोर, मद्रासमध्ये कोइमतूर, मदुराई ही केंद्र कापड उद्योगामुळे भरभराटीस आली होती.[४] त्यापैकी ढाक्याची मलमल इतकी तलम होती की ती इंग्रजांना अगदी स्वातंत्र्यप्राप्ती पर्यंत तयार करता आली नाही. महाराष्ट्र व आंध्रप्रदेशात जहाजबांधणी उद्योग भरभराटीस आला होता. पण ब्रिटीशांच्या काळात त्यांच्या ऱ्हासास सुरुवात झाली. इरफान हबीब या इतिहासकाराच्या मते भारतात पुंजीवादी तत्व नसल्यामुळे आणि उद्योगधंद्यातील उत्पादन होणाऱ्या मालासोबत येथील उद्योगधंदे स्पर्धा करु शकली नाहीत म्हणूनच त्यांचा ऱ्हास झाला.[५]

बिपिन चंद्र, तपन राय चौधरी इत्यादि इतिहासकारांनी मात्र इंग्रजांची भारतातील आर्थिक नितीच भारतीय उद्योग धंद्यांच्या ऱ्हासास कारणीभूत असल्याचे म्हटले आहे. १९ व्या शतकात भारतीय हस्तोद्योगाच्या ऱ्हासास इंग्रजांची शोषणकारी नितीच जबाबदार होती कारण इंग्लंडमध्ये कापड उद्योगांना तेथील शासनाचे सहाय्य होते.

वस्त्रोद्योग व हस्तकला उद्योग यात भारतीयांनी कुशलता प्राप्त केली होती. येथे निर्माण येथे निर्माण होण-या कलात्मक वस्तु उच्च कोटीच्या होत्या आणि म्हणूनच संपूर्ण जगात त्याची मागणी



HOD
Dept. of History,
G.B.Murarka Arts & Comm. College,
Shegaon

G.B. MURARKA COLLEGE OF ARTS & COMM.
SHEGAON
Dist Buldhana

Principal
G.B Murarka Arts & Comm.
College, Shegaon

होती मात्र हे सर्व उद्योग मध्यकालीन युरोपातील घरगुती उद्योगाच्या स्वरुपात विकसीत झालेले होते. आधुनिक औद्योगिरिणापासून ते फार दुर होते आणि म्हणून निश्चितच ब्रिटीशांनी व्यापारवादी नितीच त्याला जबाबदार होती.[६] मुर्शिदाबादचा रेसिडेन्ट बेचर म्हणतो की, कंपनीने बहुतेक सर्व निर्यात मालाची मक्तेदारी स्थापन केल्यामुळे बंगालसारख्या संपन्न प्रदेशाचा ऱ्हास झाला आहे.

**इंग्रजांचे मुक्त व्यापाराचे धोरण**

इंग्लंडमध्ये औद्योगीक क्रांतीनंतर तेथे कारखानदारी झपाट्याने वाढली. कापडचे उत्पादन मोठया प्रमाणात वाढले. म्हणुन या उत्पादित मालाला देशबाहेर बाजारपेठ मिळण्याची आवश्यकता भासू लागली. याच काळात अॅडम स्मिथ सारख्या अर्थ तज्ज्ञाने खुल्या व्यापाराच्या धोरणाचा पुरस्कार केला होता. या विचारांच्या मक्तेदारीला संपुष्टात आणले. आणि भारत व इंग्लंड यांच्या आर्थिक संबंधात सुरुवात झाली. इंग्लंड्ध्ये तयार होणाऱ्या यंत्रावरील मालाचे मुल्य भारतात तयार होणाऱ्या हातावरील वस्तुंपेक्षा कमी असल्याने किंमतीच्या बाबतीत त्यांच्या मालाशी स्पर्धा करणे भारतीय कारागिरांना शक्य झाले नाही. येथुनच भारतातील कापड उद्योगावर अनिष्ट परिणाम होण्यास सुरुवात झाली. इ. स. १८१४ मध्ये इंग्लंडमधून सुमारे आठ लक्ष वार कापड भारतात आले.[७] ते पुढे सतत वाढतेच होते.

भारतातील निर्यातीचे प्रमाण कमी होण्यास इंग्लंडचे जकात विषयक धोरणही कारणीभूत होते. इंग्लंडमधून भारतात येणाऱ्या मालावर एक टक्का जकात घेतली जाई. तर इंग्लंडला जाणाऱ्या भारतीय मालावर मोठया प्रमाणावर जकात आकारल्या जाई. इ. स. १८४० मध्ये इंग्लंडमधून भारतात येणाऱ्या मालावर ३.५ टक्के आयात कर होता तर त्याच वेळेस भारताच्या मालावर इंग्लंडमध्ये १० टक्के जकात घेतल्या जाई. ब्रिटीशांनी घेतलेल्या या निर्णयामुळे भाततातील उद्योग हळूहळू नष्ट होण्यास सुरुवात झाली.[८]

ब्रिटीशांच्या या अन्यायी व्यापारी धोरणाबाबत इंग्रज इतिहासकार एच. एच. विल्यम म्हणतात की, ब्रिटीशांनी पेस्ली व मॅचेस्टर येथील कापड गिरण्या बंद होऊ नये म्हणून भारतीय उद्योगांचा बळी घेतला इ. स. १८३३ नंतर इंग्रजांनी भारतात जहाजबांधणी, तागाच्या गिरण्या, रेल्वे, बॅंका, विमाकंपण्या इत्यादी उद्योगांमध्ये भांडवल गुंतविण्यास सुरुवात केली. कारण इस्ट इंडिया कंपनीने भारतात अवलंबिलेल्या धोरणामूळे भारतात भांडवल फारसे उपलब्ध नव्हते. ज्या भरतीयांनी अशा उद्योग धंद्यात भांडवल गुंतविण्याचा प्रयत्न केला तो ब्रिटीशांनी हाणून पाडला.[९] भारतीय अर्थव्यवस्थेवर ब्रिटीशांची पकड अधिक मजबूत झाली. येथील जनतेच्या शोषणातून भारतीय संपत्तीचा ओघ इंग्लंडमध्ये अधिक वेगाने वाहू लागला. भारतातील ढाका, सुरत, मुर्शिदाबाद, अहमदाबाद ही उत्कृष्ट सुती कापडाची केंद्रे लवकरच ओस पडू लागली. ब्रिटीशांच्या आर्थिक शोषणाच्या धोरणामुळे भारतीय हस्तकला उद्योग बंद पडून असंख्य कारागिर बेकार झाले. इंग्रजांचे भारतातील साम्राज्य इंग्लंडमध्ये नव्याने उदयास आलेल्या भांडवलशाही व्यवस्थेचे व्यापक हित साधण्यासाठी भारताचे आर्थिक शोषण करण्याची एक शक्तिशाली यंत्रणा बनले. आपल्या हेतूच्या पुर्ततेसाठी भारतीय समाजातील जमीनदार, सावकार, सरकारी अधिकारी व काही व्यापारी यांचा एक पाठीराखा वर्ग तयार करण्यात इंग्रजांनी यश मिळविले.[१०] व्यापारी मार्गातून मिळणारा अमाप नफा, अधिकारी वर्गाचे वेतन आणि भ्रष्टाचार पिळवणूकीच्या अवैध मार्गानी मिळणारा पैसा ब्रिटीशांनी इंग्लंडला नेला.

**औद्योगीक ऱ्हासाचा परिणाम**

एकेकाळी हस्तकलेत प्रविण असलेले कारागिर सुतकताईपासून तर कापडतयात करण्यापर्यंतचे सर्व काम करित होते. शेतकरी शेतीबरोबरच शेतीला पुरक काम करित होते. परंतु त्यांच्या व्यवसायावरच संक्रात आल्याने व्यावसाईक बेकार झालेत. बेकारांना इतरत्र काम न मिळू शकल्यामुळे ते शेतीकडे वळले. परिणामी शेतीवरील बोजा वाढला. ज्यांच्याजवळ शेती नव्हती ते शेतमजूर झाले. १९ व्या शतकाच्या मध्यात शेतीवर अवलंबून असणाऱ्यांची संख्या ५५ टक्के इतकी होती. इ. स. १९०१ व इ. स. १९४१ च्या भारतीय जनगणने नुसार ती अनुक्रमे ६३.७० टक्के व ७०.०० टक्के इतकी वाढली. भारतीय शेतीवरील अतिरिक्त भार हे शेतीच्या अवनितीचे कारण बनले.[११]

**सारांश :-**

प्राचिन काळापासून भारतात शेती व त्यावर आधारित उद्योग विकसीत झाले होते. ब्रिटीशांच्या वसाहतवादी अर्थकारणाने, दळणवळनाच्या साधनांमुळे, यंत्रावरील माल गावागावात जावून पोहचला. वस्तुविनियम पद्धत बंद पाडुन रोखीने व्यवहार सुरु झाले, गावातील गरजा गावात भारगविणे अशक्य झाल्या. त्यामुळे हळुहळु खेडी परावलंबी बनून ग्रामीण जीवन उध्वस्त झाले. जी बाब खेडयासाठी लागू होते तीच बाब कमी अधिक फरकाने भारतीय औद्योगिक शहरांनाही लागू पडते, भरतीय गृहउद्योग नष्ट झाल्याने कापडांच्या उद्योगासाठी प्रसिद्ध असलेल्या शहरांना अवकळा आली. इंग्लंडइतके विस्तारलेले, गजबजलेले आणि समृद्ध शहर असे मुर्शिदाबादचे वर्णन इ. स. १७५७ ला लॉर्ड क्लाईव्हने केले. अशा अहमदाबाद, ढाका, सुरत या शहरांच्याही ऱ्हासास प्रारंभ झाला.



HOD
Dept. of History,
G.B.Murarka Arts & Comm.College
Shegaon

G.B. MURARKA COLLEGE OF ARTS & COMM. SHEGAON Dist Buldhana

Principal
G.B.Murarka Arts & Comm.
College, Shegaon

काळ जस जसा लोटत गेला तशी भारतीयांत राष्ट्रीय अर्थव्यवस्थे बाबत जनजागृती घडून आली. त्यातूनच पुढील काळात विविध व्यावसायिक श्रेण्यांच्या संघटना निर्माण झाल्या. बेरोजगार शहरांकडे वळल्याने त्यांच्यात जागृती निर्माण झाली.

**संदर्भ ग्रंथ :-**

१. तांबोळी एन. एस पवार व्ही. पी. "आधुनिक भारत १७५० ते २००९" निराली प्रकाशन, पुणे २०१० पृ. ५-७
२. तांबोळी एन. एस पवार व्ही. पी. "उपरोक्त" पृ. ५-७
३. तांबोळी एन. एस पवार व्ही. पी. "उपरोक्त" पृ. ५-७
४. शुक्ल आर. एल. (संपा) "आधुनिक भारत का इतिहास" हिंदी माध्यम कार्यान्वय निर्देशालय, दिल्ली विश्वविद्यालय, दिल्ली १९९८, पृ. १२३-१२४
५. शुक्ल आर. एल. (संपा) "उपरोक्त" पृ. १२४..
६. शुक्ल आर. एल. (संपा) "उपरोक्त" पृ. १२५..
७. क्षिरसागर व्ही. एस.., "आधुनिक भारताचा इतिहास" अनिवृद्ध पब्लीशिंग, पुणे २०००, पृ. ५०
८. भिडे गजानन "आधुनिक भारताचा इतिहास" अनिरुद्ध पब्लिकेशन हाऊस, पुणे, २००० पृ. ४७ - ४८
९. वैध्य सुमन कोठेकर शांता, "आधुनिक भारताचा इतिहास" भाग-३ साईनाथ प्रकाशन, नागपुर १९९४
१०. शुक्ल आर. एल. (संपा) "पुर्वोक्त" पृ. १२७.
११. ग्रोवर बी. एल. (बेल्हेकर एन. के. अनु) "आधुनिक भारताचा इतिहास" एस. चंद आणि कंपनी लि. नवी दिल्ली २००३, पृ. ५२४

□□□

**34**

# इतिहालेखनात सबाल्टर्न इतिहासलेखन प्रवाहाचे महत्त्व

**कु. भाग्यश्री श्रीकृष्णराव गाडगे**
संशोधक विद्यार्थी,
श्री. नारायण राणा महाविद्यालय, बडनेरा, जि. अमरावती

इतिहास ही एक स्वायक्त ज्ञानशाखा आहे. ही मानवाच्या कल्याणाचा व विकासाच्या दृष्टीने उपकारक आहे. इतिहास ह्या संस्कृत शब्दाचा अर्थ 'असे घडले, अशा प्रकारे घडले' (इति+ह+आस) असा होतो.

जागतिक स्तरावर विचार केल्यास 'इतिहास लेखनाला ग्रीसमध्ये इ.स. पूर्व ६ व्या शतकात प्रारंभ झाला हे सर्वमान्य आहे. अनेक इतिहासवेत्यांनी इतिहासाच्या व्याख्या केल्या आहेत. हेरोडोटसच्या मते, "घडून गेलेल्या घटनांची माहिती पुढील पिढ्यांसाठी जतन करून ठेवणे होय." १७ व्या शतकातील प्रसिद्ध इतिहासलेखक व विचारवंत फ्रांसिस बेकनच्या मते, "इतिहास ही मानवाला सूज्ञ बनविणारी ज्ञानशाखा आहे." "इतिहास हा न बदलणा?या भूतकाळाची कथा आहे." अशी व्याख्या प्रख्यात ग्रीक तत्वज्ञ ॲरिस्टॉटलनी केली. स्थूलमानाने इतिहासाची व्याख्या करायची तर, "गतकालीन मानवी जीवनाचे वर्तमानकालीन इतिहासकारांने पद्धतशीरपणे व तर्कशुद्धरित्या घडविलेले सुसंगत व अर्थपूर्ण दर्शन अशी केल्यास ती समर्पक ठरेल.

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात इतिहास क्षेत्रात अनेक विचार प्रवाह, लेखनप्रवाह रूढ झाले व त्यांनी इतिहासाचे क्षेत्र व्यापक व समृद्ध केले. इतिहासलेखन करताना इतिहासातील प्रवाह हे अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतात. राष्ट्रवादी, साम्राज्यवादी, डावे किंवा नवमार्क्सवादी, तळागाळाचा किंवा वंचिताचा (सबाल्टर्न) हे इतिहासलेखन प्रवाह निर्माण झाले. इतिहासप्रवाह लेखनामुळे इतिहासाला एक शिस्तबद्ध चौकट तयार होऊन विषयाचे सखोल अध्ययन करण्यास मदत होते.

स्थानिक तळागाळातील लोकांनी कित्येकदा उठाव, विद्रोह केले. परंतु इतिहास ग्रंथामधून या विद्रोही उठावातील तळागाळातील जनसमुहाच्या कार्याची कोणत्याही इतिहासकारांनी दखल घेतली नाही. या सर्वसामान्यांची माहिती करून घेऊन त्यांच्या कार्याचा गौरव



HOD
Dept. of History,
G.B.Murarka Arts & Comm.College
Shegaon


G.B.MURARKA COLLEGE OF ARTS & COMM. SHEGAON Dist Buldhana


Principal
G.B Murarka Arts & Comm.
College, Shegaon

Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA




Volume-IX, Issue-I
January - March - 2020
Marathi Part - I

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

HOD
Dept. of History,
G.B.Mura... ...ts & Comm. College,
...gaon

Principal
G.B.Murarka ... & Comm.
College, Shegaon

G.B. MURARKA COLLEGE OF ARTS & COMM. SHEGAON Dist Buldhana

# CONTENTS OF MARATHI PART - I



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| [redacted] | [redacted] | [redacted] |
| १५ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या स्वप्नातील भारताची जडणघडण<br>**प्रा. डॉ. सुभाष एस. पवार** | ५४-५९ |
| १६ | ग्रामगिता आणि महिलोन्नती<br>**प्रा. डॉ. सौ. सोनाली राजेश बन्सोड** | ६०-६३ |
| १७ | राष्ट्रसंतांचे महिला सक्षमीकरणविषयक विचार<br>**डॉ. सुनिता मनवर** | ६४-६७ |
| १८ | राष्ट्रसंताचे ग्रंथाध्ययन विषयक विचार<br>**प्रा. डॉ. विलास खुणे** | ६८-७१ |
| १९ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे जीवन माणिक बंडूजी ब्रम्हभट्ट ते वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज – एक जीवनप्रवास<br>**प्रा. डॉ. कु. वैशाली भिवसेन भिसे** | ७२-७६ |
| २० | राष्ट्रसंतांचा संगीत विषयक दृष्टिकोन<br>**प्रा. वर्षा सुनील आगरकर** | ७७-७९ |
| २१ | ग्रामगीतेतील जीवनमुल्ये विषयक विचार<br>**प्रा. अनिल शिवाजी आराक** | ८०-८५ |
| २२ | राष्ट्रसंतांच्या समाज प्रबोधनामध्ये संगीताची भूमिका<br>**प्रशांत राजवर्धन** | ८६-८९ |
| २३ | ग्रामगितेतील उद्योगशीलता<br>**सौ. प्रांजली योगेश बारस्कर** | ९०-९६ |
| २४ | समाजाचा महामेरु : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज<br>**डॉ. अमोल र. बोरकर** | ९७-१०० |
| २५ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ग्रामगीतेतील जीवन मूल्ये !<br>**डॉ. सिध्दार्थ बुटले** | १०१-१०४ |
| २६ | राष्ट्रसंताची भजने, अभंग आणि समाज प्रबोधन<br>**सीमा देशपांडे** | १०५-१०८ |





HOD
Dept. of History,
G.B.Murarka Arts & Comm. College
Shegaon

G.B.MURARKA COLLEGE OF ARTS & COMM.
SHEGAON
Dist Buldhana

Principal
G.B.Mur...ka Arts & Comm.
College, Shegaon

VOLUME - IX, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# १४. ग्रामगीतेतील उद्योगशिलता

प्रा. डॉ. विलास एम. डेहणकर
सहयोगी प्राध्यापक, ग.भि. मुरारका महाविद्यालय, शेगांव, जि. बुलढाणा.

**प्रस्तावणा**

माणिक बंडोजी ब्रम्हभट (इंगळे) उर्फ राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विदर्भात 30 एप्रिल 1909 रोजी जन्मलेले हे संत आपल्या कार्याने व कर्तुत्वाने लोकशिक्षक म्हणुन नावारुपास आले. महाराजांनी आपल्या महापरिनिर्वाणापर्यंत म्हणजेच 11 ऑक्टोंबर 1968 पर्यंत त्यांनी अखंडपणे लोकशिक्षणाचे कार्य सुरु ठेवले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे प्रथमिक शिक्षणही पुर्ण न करणारे व्यक्तीमत्व. महाराजांना शिक्षण फारसे नसुनही त्यांनी जी समाजाला शिकवण दिली ती आजही प्रेरणादायी आहे व पुढेही राहील. खरा भारतीय समाज खेड्यातच आहे. महाराजांनी ग्रामगीता ही या समाजाला अनुलक्षुनच लिहीली असून त्याचे परंपरागत धर्मजीवन, धर्मशिलतेचा धागा न तोडता, आधुनिक परिस्थितीला अनुरूप अशा रितीने कसे बदलता आणि सुधरता येईल, याचे प्रतिपादन मोठ्या जाणिवेने आणि जिव्हाळयाने या गीतेत केले आहे. गेल्या दोनशे वर्षात झाकाळले गेलेले मराठी जीवन उजळून या युगात समाजाला नवे वळण लावण्याचे कार्य हा ग्रंथ करीत आहे असे दिसते.

**विषय मांडणी**

ग्रामगीता अर्पन- पत्रिका

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी इ.स.1954 मध्ये धावत्या प्रवासात, फावल्या वेळात ग्रामगीता लिहुन काढली. इ.स. 1955 मध्ये ग्रामगीता प्रकाशीत झाली. ग्रामगीतेचा प्रभाव लक्षात घेवून आज उज्जैन, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर येथे बी.ए., एम.ए. च्या अभ्यासक्रमात ग्रामगीतेचे काही अध्याय लावण्यात आले आहे.

सर्व ग्रामासि सुखी करावे । अन्न वस्त्र- पात्रादि द्यावे ।
परि स्वतः दुःखचि भोगावे । भूषण तुझे ग्रामनाथा ॥

आज ग्रामीन भागाच्या शेतकऱ्यांच्या जीवनात डोकावण्याचा प्रयत्न केला तर सर्वांगावर शहारे येतात. ग्रामिणभागातील हेच वास्तव राष्ट्रसंताच्या नजरेने टिपले व तेच त्यांनी ग्रामगीतेत मांडले. महाराजांनी ग्रामिण भागात राहणाऱ्या ह्या कष्टकरी वर्गाला भोळा शंकर संबोधले.

HOD
Dept. of History
G.B.Murarka Arts & Comm.College
Shegaon
G.B. MURARKA COLLEGE OF ARTS & COMM. SHEGAON Dist Buldhana
Principal
G.B.M... & Comm.
College, Shegaon

ऐशा भोळ्या शंकरासि । सौख्य लाभावे सर्व देशी ।

मानवाची पुर्णता तुजसी । प्राप्त व्हावी, मना वाटे ॥

अशी आंतरिक इच्छा महाराजांनी ग्रामगीतेतुन व्यक्त केली. शेतकऱ्यांच्या कष्टाचे चिज झाले पाहीजे ही आंतरीक तळमळ तुकडोजी महाराजांची होती या कारणानेच महाराजांनी ही ग्रामगीता शेतकऱ्यांना अर्पण केली.

ऋग्वेद (1-124)

विश्वं पुष्टं ग्रामे आस्मिननातुरम। महाराजांनी ऋग्वेदातील या वचनाने ग्रामगीतेची सुरुवात केली. गावागावातील ही सर्व जनता निरोगी, धष्टपुष्ट व सुखी असो । फ क्तच महाराजांनी लिहीले नाही तर प्रत्यक्ष गावा गावात जावून लोकांनमध्ये भजन, भाषनाच्या माध्यमातुन श्रमदान करुन कृती सुध्दा केली. पारतंत्र्याच्या काळात ब्रिटीशांविरुध्द स्वतंत्र्यासाठी लोकांना तयार केले. त्यासाठी ब्रिटीशांनी इ.स. 1942 मध्ये ब्रिटीशांविरुध्द लोकांच्या भावना भडकवतात म्हणुन महाराजांना तुरुंगात सुध्दा टाकले होते. राष्ट्रभिमान तसेच ग्रामोत्थानासाठी महाराजांनी जे कार्य केले त्याचा आवाका मोठा आहे. त्यांच्या या कार्यमुळेच भारताचे राष्ट्रपती मा. राजेंद्रबाबु प्रसाद यांनी महाराजांना जाहीर कार्यक्रमात राष्ट्रसंत ही उपाधी दिली. ती किती योग्य होती याचे प्रत्यय येते.

ग्रामगीता

एकुण अध्याय 41 असून त्यातील ओवीसंख्या 4,673 आहे. ग्रामगितेतील प्रत्येक अध्यायामध्ये महाराजांनी उपयोगशिलता, आचरण, शिक्षण यावर भर दिला आहे.

ईश्वस्तवन

महाराजांनी ग्रामगीता ग्रंथात सुरुवातीलाच ईश्वस्तवन केले आहे. ग्रंथात लिहील्या प्रमाणे लोक विचारातील देवाचे स्तवन कशाला करीता ? त्यावर महाराज लिहीतात

आम्ही आपुल्यासाठी मरतो । देव सकळासाठी कार्य करतो ।

हाचि भाव त्याने स्फु रतो । म्हणोनि धरला देव चित्ती ।

देवांची जी जी लक्षणे आहे ती आठवा आणि त्यांचे कार्य ध्यानात ठेवून तसे वागा. जो सर्वांसी प्रेमाने वागतो, सर्वांना सुखी ठेवण्याचा प्रयत्न करतो त्या विषयी महाराज लिहीतात

तो तत्वतः नास्तिकचि नोहे । जो सर्वांसि सुखविताहे

तो देव देव जरी न गाये । तरी देवसेवाचि त्या घडे ॥

HOD
Dept. of History,
G.B. Murarka Arts & Comm. College,
Shegaon

G.B. MURARKA COLLEGE OF ARTS & COMM. SHEGAON Dist Buldhana

Principal
G.B.M... & Comm.
Co... Shegaon

सेवाभावी राहुन राष्ट्रउभारणीच्या कार्यास हातभार लावा, नेहमी उद्योगी राहा हा संदेश महाराजांनी दिला. सोबतच गुरुजनांनी सुध्दा विद्यार्थ्यांना उचित मार्गदर्शन करुन विद्यार्थी तयार करावेत असे विद्यार्थी तयार झाल्यास संपूर्ण राष्ट्र तेजस्वी होईल यावर महाराजांचा विश्वास आहे.

**धर्म**

आपुली साधावी उन्नती । सौख्य द्यावे इतरांप्रती ।
या उद्देशे जी जी संस्कृती । धर्म म्हणावे तिजलागी ॥

सर्वधर्मीयांच्या लोकांना महाराजांनी असा संदेश दिला. आपली उन्नती साधुन इतरांना सुखी ठेवण्याचा प्रयत्न करावा. महाराजांनी सांगितल्या प्रमाणे प्रत्येकाने कृती केल्यास धर्म धर्मामध्ये जी भांडणे आहे ती कायमची मिटतील. राष्ट्रउभारणीसाठी याची नितांत गरज आहे. जी जी गोष्ट देशाच्या उत्कर्षासाठी आवश्यक आहे ती ती करण्यासाठी साऱ्या संप्रदायांनी आता कंबर कसली पाहीजे यातुन महाराजांना हेच सांगायचे आहे. असे केल्यासच आपले राष्ट्र विश्वात शोभून दिसेल यावर महाराजांचा विश्वास आहे.

**ब्रम्हचर्य:**

निधि घेऊनि ज्ञानाचा । मार्ग सुधारावा जीवनाचा ।
धर्म साधावा कुटूंब- राष्ट्राचा । याचसाठी सावधान ॥

वयाच्या 22 वर्षा पर्यंत ब्रम्हचार्यचे पालन करुन ज्ञानोपासना करावी. ज्ञानाची पुंजी घेऊन गृहास्थश्रमात प्रवेश करावा असे केल्यासच पुढील जिवन सुकर होते यावर महाराजांचा विश्वास आहे.

मुलगा जरा वयात आला । हवे तैसे वागू लागला ।
बालपणीच भोगी तारुण्याला । जन्म गेला दुःखी मग ॥

ब्रम्हचर्याचे पालन विशिष्ट वयापर्यंत न केल्यास जीवनाची कशी माती होते हे सांगायलाही महाराज विसरले नाही. आजचा बराच तरुण वर्ग पाश्चिमात्य संस्कृतीच्या अनुकरणामुळे भ्रमीष्ट झाला आहे. ब्रम्हचार्याचे पालन होत नसल्यामुळे तो इंद्रीयांचा गुलाम बनुन ज्ञान संपादनाच्या कर्तुत्व गाजविण्याच्या वयात दुबळा बनत चालला आहे. तरुण वर्गात निश्चय, चातुर्य, ज्ञानयोग, विशाल दृष्टीकोन, शरीरबळ, चपळता, ओझ इत्यादींचा अभाव दिसून येतो. ब्रम्हचार्य पालन विषयीचे राष्ट्रसंताचे विचार आजच्या तरुण वर्गाला किती मार्गदर्शक आहे याची आवश्यकता पटते.

**ग्रामसेवा-धर्म**

आपुला साधावा गृहस्थाश्रम । पाळावा ग्रामसेवाधर्म ।

HOD
Dept. of History
G.B.Murarka Arts & Com. College
Shegaon

Principal
G.B.Murarka Arts & Comm.
College, Shegaon

गावाकरीताच आपुला नेम । सांभाळावा ॥

प्रपंचाचा भार वाहतांना जनसेवेचे व्रत सोडु नये. स्वताच्या विकासासोबतच गावाचा विकास कसा होईल याची चिंता वाटावी. कष्ट करुन धन जोडावे आणि ते समाजोपयोगी लावावे निरर्थक खर्च करु नये. खरे नामस्मरण काय आहे या विषयी महाराज लिहीतात

खरे नाम निष्काम ही ग्रामसेवा । झटु सर्वभावे करु स्वर्ग गावा ।

कळो हे वळो देह कार्यी पडू दे । घडु दे प्रभो । एवढे घडु दे ।

गावाची सेवा हीच भारत देशाची सेवा आहे. अखील विश्व सुधारता येणे शक्य नसले तरी प्रत्येक गावाच्या उत्कर्षात विश्वाचा उत्कर्ष आहे. आपली मनशुध्दी, शरीरशुध्दी, ह्दयशुध्दी, घरशुध्दी प्रत्येकाने करावी. वाईट विषय टाळुन केवळ नी केवळ ग्रामसुधारनेकडेच लक्ष द्यावे यावर महाराजांनी भर दिला.

निष्काम कर्म

प्रथम ऐकावे हे गीतावचन । आचरणासि दृढ करावे मन ।

मग संकल्पाने कार्याचे साधन । ग्राम स्वर्ग करावया ॥

सर्व धर्मात ईश्वर भक्तीला मोठे स्थान आहे. पण भक्तीचा खरा अर्थ सेवा असा आहे.

पण सेवा कशी असली पाहीजे ? सर्वभुतहितध्येय डोळ्यापुढे ठेवून सर्वांच्या हिताकरीता अनासक्त भावनेने किंवा निष्कामपणाने केलेले जे कर्म तीच खरी सेवा होय. महाराज म्हणतात खरी सेवा म्हणजे निष्काम कर्म । परस्परांच्या सुखाचे वर्म ॥

समाजोनि करील जो त्याग उद्दम । तोचि सेवाभावी समजावा ॥

धर्मपालनाकरीता व्यवहार सोडला पाहीजे, असा चुकीचा समज समाजात प्रचलित होता. पण गीतेत धर्म आणि व्यवहार यात काहीच फरक केला नाही. उत्तम व्यवहार हाच खरा धर्म. मानवा मानवांतील व्यवहार गीतेतील तत्वानुसार उत्तम होत गेल्यास प्रथम ग्रामसुधारणा व अखेर विश्वसुधारणा व विश्वशांती होईल, याच उद्देशाने महाराजांनी ग्रामसुधारणे संबधी आपले सर्वांगीन तर्कशुध्द व हितकर विचार गीतेतील तत्वांच्या आधारे ग्रामगीतेत निर्भिडपणे सोप्या, सहज स्फुर्तीने, ईश्वरी प्रेरणेनुसार निघालेल्या प्रसादयुक्त ओजस्वी व कळकळीच्या भाषेत व्यक्त केला आहे जसे :-

आपुला आपण उध्दार करावा । संतदेवाचा सहारा घ्यावा ।

हाचि संत-ग्रंथाचा गवगवा । चित्ती धरावा सर्वांनी ॥

Principal
G.B.Murarka Arts & Comm.
College, Shegaon

HOD
Dept. of History,
G.B.Murarka Arts & Comm.College,
Shegaon

G.B. MURARKA COLLEGE OF ARTS & COMM. SHEGAON Dist Buldhana

सर्व मिळोनी एकत्वे रहावे । सर्वांनी सर्वांस चाहावे ।

सर्वभूत हिती रत व्हावे । ऐसेचि वचन गीतेचे ॥

एकुणच ग्रामगीतेचा अवाका फार मोठा आहे. ती सुलभ, सुबोध, प्रभावी, सर्वस्पर्शी अशी आहे. शोधनिबंधाच्या माध्यमातून थोडक्यात मांडण्याचा हा उहापोह.

## निष्कर्ष

सुंदर वाङ्मय अंतःकरणाच्या पिळातून निर्माण होते, त्याचे हे प्रात्याक्षिक आहे. ग्रामगीते या सुसंगत बोध हृदयाच्या पिळातून प्रगट झाला म्हणूनच हे खरे काव्य आहे. महाराज हे जीवन ढवळुन काढणारे द्रष्टे कवी आहेत. महाराजांनी खेडेगांवचे अत्यंत सुक्ष्म निरीक्षण केलेले आपल्याला या ग्रामगीता ग्रंथात दिसेल. खेडेगावातील सामाजिक, दुर्धर पीडा व त्यावर त्यांनी सुचविलेले इलाज अत्यंत प्रभावी आहे.

आझाद हुये अब हम, आबाद बनाना है ।

अपनेही पैरोपर यह मुल्क उठाना है ॥

एकुणच महाराजांच्या अशा प्रेरक विचारांची राष्ट्राला आज नितांत गरज आहे.

## संदर्भ ग्रंथ


- वं. राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज :- ग्रामगीता, श्रीगुरुदेव ग्रामगीता प्रतिष्ठान, गुरुदेव नगर, गुरुकुंज आश्रम, ता. तिवसा, जि. अमरावती (महाराष्ट्र) 444902 प्रकाशन तिथी प्रथम आवृत्ती इ.स.1955.
- प्रा.रघुनाथ कडवे संकलन व संपादक :- राष्ट्रसंत तुकडोजींचा जीवन प्रवास (भाग पहीला) प्रकाशन तिथी दि. 5 जुलै 2001
- राष्ट्रसंत तुकडोजी महाराज :- विश्व शांतीची सत्यता,अर्थात सामुदायीक प्रार्थना, संकलन प्रा. रघुनाथ कडवे, प्रकाशक -राष्ट्रसंत साहीत्य प्रकाशन, नागपूर प्रकाशन दि.30 एप्रिल 1992.
- बाबा मोहोड (संपादक) :- राष्ट्रसंताची प्रवचने, प्रकाशक श्रीगुरुदेव प्रकाशन, गुरुकूंज आश्रम जि. अमरावती प्रकाशन तिथी 26 जाने. 2005.
- प्रा. डॉ. नमिता शेंदरे :- संत तुकाराम-संत तुकडोजी तौलनिक स्त्रीदर्शन प्रकाशक ०: ॐ प्रकाशन, शुक्लेंद्र, 125 जुन्या हिस्टॉप कॉलेज मागे, महाल, नागपूर 440002 प्रथम आवृत्ती 19 ऑक्टोंबर 2000.
- प्रा.विलास एम. डेहणकर :- स्मृतींची चाळता पाने... प्रकाशक- सचिन उपाध्याय, विजय प्रकाशन, हनुमान गल्ली, सिताबर्डी, नागपूर 440012 प्रथम आवृत्ती 24 ऑक्टोंबर 2012.


HOD
Dept. of History,
G.B.Murarka Arts & Comm. College,
Shegaon

G.B.MURARKA ARTS & COMM. COLLEGE SHEGAON Dist Buldhana

Principal
G.B.Murarka Arts & Comm.
College, Shegaon

- महाराजांची पत्रे :- राष्ट्रसंत तुकडोजी महाराज लिखीत
- श्री. गुरुदेव सेवाश्रम, मांडुरा, :- तपःसाधना स्मरणिका, प्रकाशन जि. बुलढाणा इ.स.1994, प्रकाशक श्री हरिभाऊ वेरुळकर तपःसाधना प्रकाशन समिती, श्रीगुरुदेव सेवाश्रम, मांडुरा, जि.बुलढाणा.
- राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज :- लहर की बरखा, प्रकाशक मो.रा. पुजारी, प्रमुख, श्री. गुरुदेव प्रकाशन, गुरुकूंज आश्रम, जि. अमरावती प्रकाशन इ.स. 1999.
- श्रीगुरुदेव :- श्री. गुरुदेव प्रकाशन, गुरुकुंज आश्रम ता. तिवसा, जि. अमरावती 444 902 प्रकाशन वर्ष 2011, श्री. गुरुदेव मासिक पत्रिका.

Principal
G.B.Murarka Arts & Comm.
College, Shegaon

HOD
Dept. of History,
G.B.Murarka Arts & Comm.College
Shegaon

G.B. MURARKA COLLEGE OF ARTS & COMM.
SHEGAON
Dist Buldhana

Impact Factor – 6.261 | Special Issue - 162 | March 2019 | ISSN – 2348-7143
UGC Approved Journal List No. 40705

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal

I.F 6.261

# Women Empowerment

- GUEST EDITOR -
Dr. Dinesh R. Jaronde

- CHIEF EDITOR -
Dr. Dhanraj T. Dhangar

Printed By : PRASHANT PUBLICATIONS, JALGAON

For Details Visit To : www.researchjourney.net

HOD
Dept. of History,
G.B.Murarka Arts & Comm.College,
Shegaon

G.B.MURARKA COLLEGE OF ARTS & COMM. SHEGAON Dist.Buldhana

Principal
G.B.Murarka Arts & Comm.
College, Shegaon

**21.** **The Gallantry Feature of Vidarbhian Women Successfully Fought Against British Government in Quit India Movement: A Historical Perspective** ............ 48
Dr. Prashant R. Dhage

**22.** **Contribution of Women Playback Singers in The Field of Film Music From 1940'S-1960'S Era** ............ 50
Jaspreet Kaur Jassal

**23.** **Content Analysis on Women`s role in Politics in the context with Tamil Nadu** ............ 53
Saranya. P

**24.** **Human Rights and Women** ............ 57
Ku. Tai B. Uke

**25.** **Women and Leadership** ............ 59
Dr. Yashavanthi K,

**26.** **The Role of Music in Women Empowerment in India** ............ 61
Shallu Jasrotia

**27.** **Gender Equity And Women Power In India** ............ 63
Dr. S. S. Kawale

**मराठी**

२८. निर्मलग्राम पुरस्कार योजनेतील महिलांच्या सहभागामुळे त्यांच्यात झालेल्या बदलांचे अध्ययन ............ ६६
प्रा. राजु दिवाकरराव भोंगाडे

२९. यवतमाळ जिल्ह्यातील बंजारा समाजाच्या शेतमजुर स्त्रियांची सामाजिक–आर्थिक स्थितीचे अध्ययन ............ ७०
प्रा. सुनिता अर्जुनराव राठोड

३०. महिला सक्षमीकरण व कौटुंबिक हिसांचार ............ ७३
डॉ. नारायण एम. वघाळे

३१. भारतीय शास्त्रीय संगीताच्या विकासामध्ये महिलांची भूमिका (गायन, वादन व नृत्य) ............ ७६
प्रा. शिवदास विठ्ठलराव शिंदे

३२. विदर्भातील महिलांच्या शैक्षणिक विकासाचा भौगोलिक अभ्यास ............ ७८
डॉ. मनिषा अमित गावंडे

३३. महिला सबलीकरण : संकल्पना आणि भारतातील महिला सबलीकरणाविषयी धोरणात्मक दृष्टीकोण ............
डॉ.गंगाधर रामराव भुक्तर

३४. सिनेसंगीत आणि महिला ............ ८३
रायबोले अर्चना रामरतन

३५. असंघटीत महिला कामगार जाणिव जागृती... ............ ८६
श्री. भारत चिंतामणी बंडगर

३६. कौटुंबिक निर्णय प्रक्रियेत महिलांचे स्थान ............ ९०
डॉ. ज्योती शेषराव दिघाडे

३७. महिला सक्षमीकरण : कायदेविषयक साक्षरता ............ ९३
डॉ. धर्मेन्द्र तेलगोटे

३८. स्त्री विषयक अधिकारात फुले, शाहु, आंबेडकर यांचे योगदान ............ ९६
प्रा. डॉ. विलास एम. डेहणकर

३९. ग्रामीण महिला व सक्षमीकरण ............ ९८
डॉ. मेघा सबाने

४०. ताराबाई शिंदेचा स्त्रीवादी दृष्टिकोन व आजच्या स्त्रियांचे सक्षमीकरण ............ १०१
प्रा. डॉ. ईश्वर सोमनाथे

४१. भारतातील स्त्री सक्षमीकरणाचे धोरण आणि महिलांची स्थिती एक मूल्यमापन ............ १०५
प्रा. डॉ. गजेंद्र कढव


HOD
Dept. of History,
G.B.Murarka Arts & Comm. College,

G.B.MURARKA COLLEGE OF ARTS & COMM. SHEGAON Dist Buldhana

Principal
G.B.Murarka Arts & Comm. College Shegaon

ISSN : 2348-7143
March 2019
RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal
*Impact Factor (SJIF) - 6.261* | *Special Issue 162 :* Women Empowerment

# स्त्री विषयक अधिकारात फुले, शाहु, आंबेडकर यांचे योगदान

**प्रा. डॉ. विलास एम. डेहणकर**
सहयोगी प्राध्यापक
ग. भि. मुरारका महाविद्यालय, शेगांव, जि. बुलडाणा ४४४ २०३

**सारांश :**

भारतीय प्रबोधनाचा कालखंडात इंग्रजी शिक्षणा बरोबरच ख्रिश्चन धर्माच्या प्रसारासाठी मिशनरी भारतात आलेत. त्यांनी भारतातील सामाजीक कुप्रथा सती, बालविवाह, स्त्री बळी, विधवा समस्या इत्यादी पाहील्यात, आणि अशा अमानविय प्रथा बंद करण्यासाठी प्रयत्न केले. विशेषतः स्त्रीयांच्या अधिकाराचे रक्षण करण्यासाठी भारतीयांचा विरोध पत्करून कायदे करण्याची जबाबदारी भारतीय समाज सुधारकांच्या मदतीने केली. इ.स. १८२९ ला सती प्रथा कायद्याने बंद केली. तर पुढील काळात विधवा पुनर्विवाह कायदा, विवाह वयाच्या संमतीचा कायदा इ. हे करत असतांना त्यांना राजर्षी शाहु महाराज, महात्मा ज्योतीराव फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीच स्त्री विषयक केलेल्या कार्यांचा कसा उपयोग झाला त्याचा परामर्श घेणारा हा लेख.

**प्रस्तावणा :**

विधात्याने निर्मिलेल्या या सृष्टीतलावरील सर्व प्राणिमात्रांमध्ये असलेली सर्वांग सुंदर रचना म्हणजे स्त्री, निसर्गाचे संतुलन राखले जावे आणि या पृथ्वीतलावर प्रेम, मोह, माया या भावनांचा अविष्कार होवून प्रेमळ विश्व निर्माण व्हावे या उदात्त हेतुने परमेश्वराने पुरुषाची सहचारिणी म्हणून स्त्रियांची उत्पत्ती केली. सतयुगात स्त्रियांना पुजनीय मानले जाई. यत्र नार्यस्तु पुजन्ते, रमंन्ते तत्रह देवताहः असे संस्कृत वचन प्रसिध्द आहे. भारतीय समाजात देवतांबरोबरच देवीचाही दर्जा उच्च होता. परंतू वैदीक कालखंडात समाजरचनेची सुत्रे सनातन कर्मठ हिंदु लोकांकडे गेली आणि भारतीय समाजात स्त्रिचं महत्व आणि अस्तीत्व नाकारल्या गेलं. तत्कालीन समाजव्यवस्थेने स्त्रियांसाठी ठरविलेली चौकट म्हणजे पतीव्रता त्यामुळे पतीनिष्ठा, आज्ञापालन, शरिरसुखाची पुर्तता एवढ्यावरच त्यांचे आयुष्य मर्यादीत होते. त्यातही विधवा स्त्रियांची स्थिती तर फारच बिकट होती. पती निधनानंतर केशवपन करुन त्यांना विद्रुप केले जाई. तुच्छतेने वागविले जाई नाहीतर पतीच्या चितेसोबतच तीला सती जाण्यासाठी दबाव आणला जाईल. अशा बुरसटलेल्या विचारसरणीच्या काळात ब्रिटीशांनी भारतात शिक्षणाचा पाया घातला तरी त्याचा फायदा उच्च कुटूंबातल्या स्त्रियांनाच झाला. तळागळातल्या स्त्रियांची मात्र पाटी कोरीच राहीली. इंग्रजी राजवटीत विधवा पुनर्विवाह कायदा, बालविवाह कायदा अशा सारखे कायदे केल्या गेले. परंतु कर्मठ विचारसरणीपुढे ते निष्प्रभ ठरले. पुढे १८ व्या शतकाच्या प्रारंभी सुधारणावादी चळवळी झाल्या त्यात प्रामुख्याने महात्मा ज्योतीबा फुले, राजर्षी शाहु महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्रियांच्या परिस्थितीत परिवर्तन करण्यात आणि एक प्रकारे स्त्रियांमध्ये क्रांती घडवुन आणण्यात मोलाची भुमिका बजावली.

**महात्मा ज्योतीबा फुले यांचे स्त्रि शिक्षणाचे कार्य :**

१८ व्या शतकात आलेल्या फुले यांच्या झंझावातानं भारतीय पारंपारीक आणि सनातन विचारसणीला सर्वात प्रथम छेद देण्याचं काम केलं. अंधश्रध्दा आणि जुन्या चालिरितीनी बरबटलेल्या हिंदु समाजातील स्त्रियांच्या तत्कालीन परिस्थितीत बदल तेव्हाच होवू शकेल जेव्हा त्या शिक्षित होतील. अन्यायाविरुध्द लढण्याचे धारिष्ट्यही त्यांना तेव्हाच प्राप्त होईल याची जाणीव त्यांना होती. म्हणूनच त्यांनी स्त्री शिक्षणाचा जोरदार पुरस्कार केला. हिंदु शास्त्राच्या मते स्त्रिया आणि शुद्र यांना विद्येचा अधिकार नव्हता. अशा संकुचीत विचारसरणीच्या काळात स्त्रियांची होणारी परवड फुलेंना स्वस्थ बसु देत नव्हती. स्त्रि ही माणुस आहे आणि तिला माणुसकीच्या हक्कांची जाणिव करुन देण्यासाठी शिक्षणासारखे दुसरे शस्त्र नाही हे फुलेंनी ओळखले.

विद्येविना मती गेली, मतीविना निती गेली
नितीविना गती गेली, गतीविना वित्त गेले
वित्तविना शुद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले.

फुलेंनी सांगीतलेल्या विद्येच्या या महत्वानूसार मानवाच्या कल्याणा करिता शिक्षण हाच एकमेव मार्ग आहे.

ज्योतीबांनी स्वतःच्या पत्नीला, सावित्रीबाईंना शिक्षित करुन त्यांच्याच सहकार्याने दिनांक ०१ जानेवारी १८४८ रोजी पुण्याच्या बुधवार पेठेत तात्यासाहेब भिडे यांच्या वाड्यात पहीली मुलींची शाळा सुरु केली. भिडे हे जोतीबांचे स्नेही होती. जागेचे कोणतेही भाडे न आकारता त्यांनी जोतीबांच्या या पहील्या शिक्षणकार्यास रुपये १०१ ची देणगी व दरमहा रु. ५ ची आर्थिक मदत केली. शिक्षण क्षेत्रात दोन वर्षापेक्षा अधिक काळ अनुभव घेतल्यावर जोतीरावांनी बुधवार पेठेत ३ जुलै १८५१ रोजी मुलींची शाळा काढली. पुढे १७ सप्टेंबर १८५१ रोजी रास्ता पेठेत दुसरी, आणि १५ मार्च १८५२ रोजी वेताळपेठेत तिसरी शाळा काढली. हे सर्व करतांना जोतीबा व सावित्रीबाईंना सनातनी धर्ममार्तंडाचा प्रचंड त्रास व रोष सहन करावा लागला. स्त्री उन्नतीसाठी झपाटलेल्या दोघांना मात्र कशाचीही तमा नव्हती.

जोतीरावांचे कार्य केवळ शाळा काढण्यापुरतेच मर्यादीत नव्हते तर स्त्रियांच्या सामाजिक समस्या सोडविण्यातही ते अग्रेसर होते. त्यांनी २८ जानेवारी १८५३ ला बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली. वाट चुकलेल्या विधवांच्या प्रसुतीची सोय करुन देवून भ्रुणहत्येपासून त्यांना परावृत्त केले. अशाच एका विधवेचा पुत्र स्वतः दत्तक घेवून एक आदर्श समाजापुढे ठेवला. विधवा पुनर्विववाह करणारी स्त्रियांची संघटना त्यांनी सावित्रीबाईच्या पुढाकाराने स्थापन केली आणि केशवपनविरोधात तिव्र आंदोलन केले.

जोतिराव फुले यांनी भारतात अमुलाग्र क्रांतीची मुहूर्तमेढ स्त्रि

HOD
Dept. of History,
G.B.Murarka Arts & Comm.College

Principal
G.B.Murarka Arts & Comm.,
College, Shegaon

शिक्षणाच्या कार्याने रोवली. स्त्रिया आणि शुद्रांसाठी शाळा काढुन त्यांनी ज्ञानाची गंगोत्री घराघरात पोहचवून भारतात समता प्रस्थापीत करण्याचा अखंड प्रयत्न केला.

**राजर्षी शाहु महाराजांचे स्त्रि विषयक कार्य :**

इतिहासात जमा होवून केवळ संशोधकांसाठी फक्त उरलेले राजे भारतात असंख्य होवून गेले. परंतु ज्यांनी इतिहास घडविला आणि जे आजच्या वर्तमानातही शिल्लक आहेत असे राजे महाराष्ट्रात दोनच. एक स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज आणि दुसरे कर्ते समाजसुधारक राजर्षी शाहु महाराज. वयाच्या विसाव्या वर्षी कोल्हापूर संस्थानच्या राज्यकारभाराची सुत्रे हाती घेवून त्यांनी दलीत, इतर मागासवर्गीय, स्त्रिया, कामगार यांच्या उद्धारासाठी मोलाची कामगिरी केली. स्त्रि शिक्षणास त्यांनी प्रोत्साहन दिले त्याच प्रमाणे स्त्रिया आणि विवाहसंबधी केलेले कायदे त्यांच्या समाजसुधारकत्वाची खरी खुण आहे.

धर्माच्या नावाखाली देवांना मुले, मुली वाहण्याची प्रथा संस्थानात होती. त्यातुन अनेक अनैतिक गोष्टी घडत. महाराजांनी जोगत्या मुरळी प्रतिबंधक कायदा केला. इ.स. १९१७ साली. विठ्ठलभाई पटेल यांनी केंद्रीय मंत्रिमंडळात आंतरजातीय विवाहाचा कायदा मांडला होता. त्याला अनेक नेत्यांचा विरोध होता. परंतु महाराजांनी या बिलास जोरदार पाठींबा तर दिलाच शिवाय कोल्हापूर संस्थानात आंतरजातीय विवाहास मान्यता देणारा कायदाच केला. या कायद्यासोबतच त्यांनी विधवा पुनर्विवाहासंबधीचा देखील कायदा केला. त्याकाळात संस्थानात जात पंचायतीच्या कायद्यानूसार व्यवहार चालत असत. हे कायदे पुरुषांना अनुकूल आणि स्त्रीयांना प्रतिकुल असत. महाराजांनी जातीप्रथेप्रमाणे घटस्फोट घेण्यासंबधी कायदा केला. स्त्रियांना सुध्दा घटस्फोटासाठी परवानगी दिली. हे कायदे करतांना महाराजांनी मुंबई आणि मद्रास हायकोर्टाच्या निवृत्त न्यायाधिशांचा सल्ला घेतला होता. या कायद्यांमुळे स्त्रियांचे छळ थांबले नाहीत हे खरे असले तरी त्यांना आधार मात्र निश्चीत मिळाला होता.

**हिंदु कोड बिल व स्त्री विकास :**

शुद्रातिशुद्र शिकले तर ब्राम्हण मरणार नाही, उलट देश जिवंत होईल व एक दिवस तुमचे धर्मग्रंथ जाळणारा एखादा माणूसच या शुद्रांत जन्माला येईल अशी भविष्यवाणी या विज्ञानयुगात सत्य करुन दाखवणारे डॉ. बाबेडकरांची स्त्रियांच्या संदर्भात व्यापक पुरोगामी विचारसरणी होती. तळागाळातली स्त्री शिक्षित झाल्याशिवाय आणि त्यांना कायद्याचे पाठबळ मिळाल्याशिवाय त्यांचा दर्जा सुधारणार नाही याची पूर्ण जाणीव त्यांना होती. म्हणून स्त्रियांच्या हक्काची सनद असलेले हिंदु कोड बिल कोणत्याही परिस्थितीत संसदेत त्यांना पास करुन घ्यायचे होते.

कायदेमंत्री या नात्याने बाबासाहेबांनी रात्रंदिवस खपुन, जीवाचे रान करुन प्रत्येक कलमाची कायद्यांच्या दृष्टीने काटोकोर अभ्यासपूर्वक मांडणी केली. या बिलाचे ८ भाग होते. त्यात १३६ कलमे आणि ७ सुची होत्या. या बिलाची सात अंगे होती. विवाह, विवाह विच्छेदन, घटस्फोट (परित्याग, धर्मांतर, परस्त्री ठेवणे, भयंकर महारोग, गुप्तरोग, बरे न होणारे वेड, क्रौर्य), दत्तक, संपत्ती, उत्तराधिकारी, पोटगी अशा तऱ्हेने हिंदु कोड बिलात महत्त्वपूर्ण कलमे होती. दि. ११ फेब्रुवारी १९४८ रोजी प्रवर समितीकडून आलेल्या विधेयकावर प्रदिर्घ काळ संविधान सभेत चर्चा झाली व बिल पास झाले.

बाबासाहेबांचे हे बिल म्हणजे भारतीय महिलांच्या जीवनाची दिशा बदलवूनटाकण्यात मैलाचा दगड सिध्द करणारे होते. परंतु स्त्रिला दासी समजणारी पुरुष प्रधान संस्कृती, स्त्रिचे स्वातंत्र्य, अधिकार या संकल्पनाच पचवू शकल्या नाहीत. परिणामतः कट्टर, हिंदुत्ववादी शक्तींनी ते बिल पास होवू न देण्यात धन्यता मानली. परंतू कालांतराने स्त्रि स्वातंत्र्याचा पुरस्कार होवू लागला. त्यामुळे भारतीय कायदेमंडळाने १९८० ते २०१० या काळात महिलांसाठी समान वेतन कायदा १९७६, हुंडाबंदी कायदा १९८५, सती प्रतिबंधक कायदा १९८७, बालविवाह प्रतिबंध कायदा २००६ इ. कायदे हिंदु कोड बिलाचाच आधार घेवून तयार केले. हे बिल एकसंधपणे पास व्हावे अशी बाबासाहेबांची इच्छा होती. परंतु कालांतराने टप्याटप्याने संसद महीला विकासाकरीता कायदे करीत आहे आणि बाबासाहेबांच अपुर्ण राहीलेले स्वप्न पुर्णत्वास येत आहे.

**निष्कर्ष :**

भारतीय पुरुषप्रधान संस्कृतीत कित्येक वर्षापासून जखडलेल्या स्त्रियांना अज्ञान आणि अन्यायाच्या गर्तेतुन बाहेर काढण्यासाठी जोतीबा फुलेंनी स्त्री शिक्षणाचा पाया रचला. राजर्षी शाहु महाराजांनी आपल्या संस्थानात स्त्रियांच्या उन्नतीसाठी पुरक कायद्याची चौकट निर्माण केली आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदु कोड बिलाच्या रुपाने त्या चौकटीवर कळस चढविला. फुले, शाहु, आंबेडकरांनी केलेल्या स्त्रि सक्षमीकरणाच्या या कामगीरीमुळे आज भारतीय समाजाचे चित्रच पालटले आहे. आज राजकारण, समाजकारण, अर्थकारण, शिक्षण इ. सर्व क्षेत्रात स्त्रिया अग्रेसर आहेत. स्त्रियांनी कायद्याचे ज्ञान प्राप्त केल्यामुळे अन्यायाविरोधात आवाज उठविण्याचे धारिष्ठ्य त्यांच्या अंगी निर्माण झाले आहे. पारंपारीक रुढीचे वलय नष्ट करुन आजची स्त्रि आकाशात उंच भरारी घेण्यास सक्षम झाली आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

१) शिंदे ताराबाई., स्त्रि पुरुष तुलना, प्रतिमा प्रकाशन, पुणे १९६७.
२) पवार ना.ग., क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, भारती प्रकाशन, पूणे १९६५.
३) पाणसरे कॉ. गोविंद, राजर्षी शाहु वसा आणि वारसा, श्रमिक प्रतिष्ठाण, कोल्हापूर.
४) लांजेवार, डॉ.प्रा.ज्योती, फुले आंबेडकरी स्त्री चळवळ, समता प्रकाशन, नागपूर २००२
५) किर धनंजय, महात्मा ज्योतीराव फुले, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९६८

HOD
Dept. of History,
G.B.Murarka Arts & Comm.College

G.B. MURARKA COLLEGE OF ARTS & COMM. SHEGAON Dist Buldhana

Principal
G.B.Murarka Arts & Comm.
College, Shegaon